# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १११ वा ❑ भारतीय सौर दिनांक २० ज्येष्ठ शके १९४८, बुधवार दि.१० जून २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### थिरकत्या पावलांना मृत्यूचे ग्रहण: तरुणांच्या मृत्यूचे वाढते प्रमाण

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

तरुणांमध्ये अचानक हृदयविकाराच्या झटक्यामुळे किंवा सडन कार्डिॲक अरेस्टमुळे ( मृत्यू होण्याचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढत आहे. नाचताना, व्यायाम करताना किंवा खेळताना अचानक कोसळून तरुणांचा जीव जाण्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत.

कार्यक्रमांदरम्यान किंवा लाईव्ह कॉन्सर्टमध्ये तरुणांचे होणारे मृत्यू अतिशय चिंताजनक आहेत. हे मृत्यू बहुतांश वेळा अतिउत्साह, दमछाक, अमली पदार्थांचा अतिरेक (ड्रग्ज ओव्हरडोस) किंवा अचानक हृदयविकाराचा झटका ( ) आल्यामुळे होतात.

काही दिवसांपूर्वी गोरेगाव येथे झालेल्या कॉन्सर्टदरम्यान ड्रग्ज घेतल्यामुळे तरुणाचा मृत्यू झाला होता. या घटनेमुळे मुंबईत खळबळ माजली होती. त्यापाठोपाठ आता मुंबईतील एनएससीआय () वरळी डोम येथे आयोजित एका लाईव्ह म्युझिक कॉन्सर्टदरम्यान एका तरुणाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. तसेच तरुणासोबत असलेल्या तरुणीची प्रकृती बिघडल्याने तिलाही रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

वरळी डोम येथील या लाईव्ह म्युझिक कार्यक्रमाला हजारो प्रेक्षकांनी हजेरी लावली होती.कार्यक्रमादरम्यान मयत तरुण आणि त्याच्यासोबत असलेल्या तरुणीने मोठ्या प्रमाणात मद्यप्राशन केले होते. मद्याचा अतिरेक आणि प्रचंड गर्दीमुळे होणारी घुसमट यामुळे दोघांनाही अस्वस्थ वाटू लागले. नाचत असताना अचानक तो तरुण खाली कोसळला. त्याला तात्काळ जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले. मात्र उपचारादरम्यान रात्री उशिरा त्याचा मृत्यू

तरुणांमध्ये वाढणाऱ्या या समस्यांमागे अनेक कारणे आहेत. कोणत्याही वयाच्या व्यक्तीला सध्या हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. सतत बैठे काम, व्यायामाचा अभाव, तणाव, झोप न लागणे या गोष्टी कारणीभूत आहेत.नाचताना किंवा कार्यक्रमात अति दगदग झाल्यास हृदय आणि फुफ्फुसांवर ताण येतो.सुरक्षेचे अभाव आणि निष्काळजीपणा मुळे देखील अनेक तरुणांचा मृत्यू झाला.अशा कार्यक्रमांमध्ये गर्दीचे योग्य नियंत्रण नसते. आयोजकांकडून वैद्यकीय आपत्कालीन सेवा वेळेवर न मिळणे, तसेच वेळेचे नियम न पाळल्यामुळे तरुणांच्या आरोग्याला धोका निर्माण होतो.

विशेष म्हणजे अनेक लेट-नाईट पार्ट्या आणि म्युझिक कॉन्सर्टमध्ये अमली पदार्थांचा अनिर्बंध वापर होत असल्याचे समोर आले आहे.या नशेत असताना शरीराचे वरील ताबा सुटणे किंवा प्रमाणापेक्षा जास्त सेवन (केल्यामुळे अचानक मृत्यू होण्याच्या घटना वाढल्या आहेत.

अनेक तरुणांना अनुवांशिक किंवा जन्मापासून असलेल्या हृदयाच्या आजारांची (उदा. हायपरट्रॉफिक कार्डिओमॅओपॅथी) कल्पना नसते. अति-उत्साहात व्यायाम करताना किंवा शारीरिक ताण आल्यास हे आजार जीवघेणे ठरतात.अति-तीव्र व्यायाम हे मृत्यूचे कारण ठरत आहे. शरीराच्या क्षमतेपेक्षा जास्त आणि अचानक सुरू केलेले जड व्यायाम, तसेच अति-कॅफिनयुक्त एनर्जी ड्रिंक्सचे सेवन हृदयाच्या ठोक्यांमध्ये अडथळा निर्माण करू शकते. अपुरी झोप, कामाचा अतिरिक्त ताण, जंक फूडचे अतिसेवन आणि व्यसनांमुळे कमी वयातच रक्तवाहिन्यांमध्ये ब्लॉकेजेस तयार होण्याचा धोका वाढतो.काही वैद्यकीय अहवालानुसार, कोरोना संसर्गामुळे हृदयाच्या स्नायूंवर झालेली जळजळ किंवा कमतरता देखील यामागील एक कारण असू शकते. तरुणांनी अशा कार्यक्रमांना जाताना स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच, आयोजकांनी सुरक्षेचे नियम काटेकोरपणे पाळणे आणि कार्यक्रमाच्या ठिकाणी वैद्यकीय पथक तयार ठेवणे कायद्याने बंधनकारक आहे.

# श्याम बेनेगल यांचे चित्रपट वास्तववादी आणि कलात्मक-भारत सासणे

ज्योतिर्मय साहित्य

सातारा – ''श्याम बेनेगल यांच्या चित्रपटांमध्ये ग्रामीण भारतातील सरंजामशाही, जातीयवाद, महिलांचे शोषण आणि मानवी हक्कांचे प्रश्न प्रकर्षाने मांडले गेले आहेत. लेखिका डॉ. सविता नायक-मोहिते यांनी श्याम बेनेगल: एक व्यक्ती एक दिग्दर्शक या पुस्तकातून त्यांच्या या वैशिष्ट्यांवर योग्य प्रकाश टाकला असून, हे आशयघन पुस्तक नवोदित दिग्दर्शकांसाठी एक उत्तम शैक्षणिक मार्गदर्शक ठरेल,'' असे उद्गार ९५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ साहित्यिक भारत सासणे यांनी काढले. येथील आम्ही पुस्तक प्रेमी समूह आणि दीप लक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित यांच्या संयुक्त विद्यमाने दीप लक्ष्मी पतसंस्थेच्या सभागृहात या पुस्तक चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात श्री. सासणे बोलत होते. बेनेगल यांच्या दिग्दर्शकीय प्रवासाचा पट बहुभाषिक वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी हे पुस्तक इंग्रजी, हिंदी आणि उर्दू भाषांमध्ये अनुवादित करून प्रकाशित करावे, असा मोलाचा सल्लाही त्यांनी यावेळी लेखिकेला दिला.



कार्यक्रमाच्या प्रारंभी आम्ही पुस्तक प्रेमी समूहाचे संस्थापक डॉ. संदीप श्रोत्री यांनी समूहाच्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. श्याम बेनेगल हे एक व्यक्ती आणि दिग्दर्शक म्हणून कसे मोठे होते, हे त्यांनी विविध उदाहरणांसह स्पष्ट केले. सविता नायक-मोहिते यांचे हे पुस्तक केवळ दिग्दर्शकाचे आत्मचरित्र नसून, त्यांच्या चित्रपटांचा आणि दिग्दर्शकीय भूमिकेचा तो एक

सखोल शैक्षणिक अभ्यास आहे, असे डॉ. श्रोत्री म्हणाले. त्यानंतर ज्येष्ठ लेखक प्रा. बाळासाहेब लबडे यांनी बेनेगल यांच्या चित्रपटांमागची भूमिका उलगडताना अंकुर, निशांत, मंथन, सरदारी बेगम आदी चित्रपटांचा विस्तृत आढावा घेत त्यातील कथाप्रसंग श्रोत्यांसमक्ष जिवंत केले. शबाना आजमी, नसिरुद्दीन शाह, स्मिता पाटील यांसारख्या कसदार कलावंतांना घडवण्यामध्ये बेनेगल यांची मोठी भूमिका होती, असे प्रा. लबडे यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात नमूद केले.

महिलांच्या प्रश्नांवर सतत आग्रही भूमिका घेणाऱ्या ज्येष्ठ पर्यावरणवादी लेखिका ॲड. सीमंतिनी नुलकर यांनी बेनेगल यांच्या चित्रपटातील स्त्री आणि तिची बंडखोर वृत्ती यावर प्रकाश टाकला. विशेषतः अंकुर चित्रपटातील कथानक, स्त्री व्यक्तिरेखा आणि अभिनय याविषयी त्यांनी विस्ताराने विश्लेषण केले. या प्रसंगी ज्येष्ठ चित्रपट अभ्यासक श्रीराम नानल यांनी मुंबईतील मेट्रो सिनेमा गृहात झालेल्या अंकुर सिनेमाच्या प्रीमियर शोच्या ऐतिहासिक आठवणींना उजाळा दिला. हे पुस्तक प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक श्याम बेनेगल यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, कलादृष्टीचा आणि चित्रपटसृष्टीतील योगदानाचा अत्यंत अभ्यासपूर्ण वेध घेते, असे प्रतिपादन त्यांनी आपल्या मनोगतात केले. तर, शिरीष चिटणीस यांनी भारतीय चित्रपटसृष्टीचा एकूण आढावा घेत श्याम बेनेगल यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाचा भावपूर्ण उल्लेख केला. पुस्तकाच्या लेखिका डॉ. सविता नायक-मोहिते यांनी पुस्तक निर्मितीचा प्रवास सांगताना, एका शैक्षणिक प्रकल्पाच्या निमित्ताने श्यामबाबू (बेनेगल) यांच्याशी झालेली पहिली भेट आणि त्यानंतर सुरू झालेली लेखनप्रक्रिया यावर प्रकाश टाकला. आपल्या वैद्यकीय पेशाचा संदर्भ देत त्या म्हणाल्या की, ''आम्ही डॉक्टर मंडळी एंडोस्कोपी, ईसीजी, एक्स-रे अशा विविध मार्गांनी रुग्णाचे शरीर तपासतो; पण त्याने माणसाचे मन दिसत नाही. माणसाचे हे अंतरंग बघण्याचे आणि तपासण्याचे काम साहित्य करते.'' त्यांच्या या उद्गारातून त्यांचे साहित्यावरील निस्सीम प्रेम दिसून आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. संदीप श्रोत्री यांनी भारत सासणे यांचे, तर श्रीराम नानल यांनी प्रा. बाळासाहेब लबडे यांचे स्वागत केले. अध्यक्ष या नात्याने भारत सासणे यांनी लेखिका डॉ. सविता नायक-मोहिते, ॲड. सीमंतिनी नुलकर आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य विनोद कुलकर्णी यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन सविता कारंजकर यांनी केले. साताऱ्यात अशा एका दर्जे दार आणि आगळ्यावेगळ्या चर्चासत्राचे आयोजन केल्याबद्दल उपस्थित रसिक सातारकरांनी आयोजकांचे विशेष आभार मानले.

# भारतातील पहिल्या 'हेवी इलेक्ट्रिक व्हेईकल्स सेंटर ऑफ एक्सलन्स'चे छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयात उद्घाटन

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर : सीएसएमएसएस छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयाने उद्योगाभिमुख आणि भविष्यकालीन तांत्रिक शिक्षणाच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत, जेएसडब्ल्यू फाउंडेशन, जेएसडब्ल्यू ग्रीनटेक लिमिटेड आणि आयएसआयई इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने भारतातील पहिले 'हेवी इलेक्ट्रिक व्हेईकल सेंटर ऑफ एक्सलन्स' सुरू केले आहे.

इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रात वेगाने होत असलेल्या बदलांचा आणि हरित तंत्रज्ञानाच्या वाढत्या गरजांचा विचार करून हे केंद्र उभारण्यात आले आहे. विशेषतः हेवी इलेक्ट्रिक व्हेईकल्स क्षेत्रात प्रशिक्षित आणि उद्योगसिद्ध मनुष्यबळ तयार करण्याच्या उद्देशाने हे सेंटर विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

या केंद्राचे उद्घाटन जेएसडब्ल्यू ग्रीनटेक लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुमित मित्तल यांच्या हस्ते रिबीन कापून करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी सेंटरला भेट देत उपलब्ध अत्याधुनिक सुविधा, उपकरणे आणि प्रशिक्षण प्रणालीची पाहणी केली. तसेच या केंद्रात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या प्रशिक्षणाविषयी माहिती घेतली.

यानंतर महाविद्यालयाच्या सभागृहात औपचारिक उद्घाटन समारंभ पार पडला. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला तसेच प्रशिक्षण कार्यक्रमाच्या पुस्तिकेचे प्रकाशनही करण्यात आले.

जेएसडब्ल्यू ग्रीनटेक लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी () श्री. सुमित मित्तल यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ''भारतामध्ये इलेक्ट्रिक मोबिलिटी आणि शाश्वत तंत्रज्ञान क्षेत्र झपाट्याने विकसित होत असून, उद्योगांना भविष्यात अत्याधुनिक कौशल्यांनी सज्ज अभियंत्यांची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता भासणार आहे.




या 'हेवी इलेक्ट्रिक व्हेईकल सेंटर ऑफ एक्सलन्स'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ई-मोबिलिटी, बॅटरी टेक्नॉलॉजी, स्मार्ट कंट्रोल सिस्टीम्स आणि आधुनिक औद्योगिक प्रक्रियांवर जागतिक दर्जाचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण दिले जाईल. उद्योग आणि शिक्षण यांच्यातील दरी कमी करत, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगविश्वासाठी सक्षम बनविण्याच्या दिशेने हे केंद्र महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल.''

कार्यक्रमात आयएसआयई इंडिया चे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विनोद गुप्ता यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, ''भारतामध्ये इलेक्ट्रिक मोबिलिटी क्षेत्र झपाट्याने विकसित होत आहे. अशा वेळी उद्योगसिद्ध कौशल्य असलेले अभियंते तयार करणे ही काळाची गरज आहे. सीएसएमएसएस छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयासोबत सुरू केलेले हे सेंटर विद्यार्थ्यांसाठी मोठ्या संधी निर्माण करेल.''


सीएसएमएसएसचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख यांनी आपल्या मनोगतात सांगितले, ''विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञान न देता, प्रत्यक्ष उद्योगमान्य कौशल्ये देणे ही संस्थेची प्राथमिकता आहे. जेएसडब्ल्यू आणि आयएसआयई इंडिया यांच्या सहकार्याने सुरू झालेले हे सेंटर विद्यार्थ्यांच्या करिअर घडविण्यात मोलाची भूमिका बजावेल.''

जेएसडब्ल्यू फाउंडेशनचे सेक्टर हेड श्री. महेश शेट्टी, जेएसडब्ल्यू ग्रीनटेक लिमिटेड चे सीओओ (मुख्य कार्यकारी संचालन अधिकारी) श्री. अमितव सहाय आणि संचालक मंडळाचे सदस्य श्री. विजय सिन्हा यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील इलेक्ट्रिक वाहन उद्योगातील संधींबाबत मार्गदर्शन केले. या प्रसंगी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे यांनी सीएसएमएसएस छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय हे नेहमीच विद्यार्थ्यांना भविष्यकालीन तंत्रज्ञानाशी जोडण्यासाठी प्रयत्नशील राहिले आहे. यापूर्वी महाविद्यालयात इंडस्ट्रियल रोबोटिक्स, ड्रोन ट्रेनिंग, ई-व्हेईकल, टोयोटा किर्लोस्कर एक्सलन्स सेंटर, बजाज एक्सलन्स सेंटर, इंजिनिअरिंग एक्सप्लोरेशन तसेच ॲपल लॅब यांसारख्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. आता 'हेवी इलेक्ट्रिक व्हेईकल्स सेंटर ऑफ एक्सलन्स'च्या स्थापनेमुळे महाविद्यालयातील सेंटर ऑफ एक्सलन्सची संख्या १० वर पोहोचली आहे. यामुळे महाविद्यालयाच्या उद्योगाभिमुख शिक्षण व्यवस्थेत आणखी एक महत्त्वपूर्ण भर पडली आहे'' असे नमूद केले.

या उपक्रमास सर्वांना शुभेच्छा देताना संस्थेचे सचिव मा. श्री. पद्माकरराव मुळे यांनी असे सांगितले की, ''हरित तंत्रज्ञान, ई-मोबिलिटी आणि ऑटोमेशन हे भविष्यातील उद्योगविश्वाचे केंद्रबिंदू ठरणार आहेत. विद्यार्थ्यांनी अशा अत्याधुनिक सुविधांचा लाभ घेत संशोधन, नवोपक्रम आणि कौशल्य विकासावर भर द्यावा. हे 'हेवी इलेक्ट्रिक व्हेईकल सेंटर ऑफ एक्सलन्स' विद्यार्थ्यांना केवळ रोजगारक्षम बनवणार नाही, तर भारताच्या हरित आणि तांत्रिक भविष्याच्या निर्मितीतही महत्त्वपूर्ण योगदान देण्यासाठी सक्षम करेल.''.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. देवेंद्र भुयार, विविध विभागप्रमुख, प्राध्यापकवृंद, विद्यार्थी तसेच उद्योग क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## जात्यावरच्या ओव्या......

मावेना मांडवात
भाऊ तुझे सवंगडी
पंगतीला वाढती
वरणभाता संग कढी ||६८३||

मावेना मांडवात
झुंबड पंगतीला
दाटीवाटीन बसल्या
बहिणी संगतीला ||६८४||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ३९




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

संत तुकाराम महाराज म्हणतात, ''ठेविले अनंते तैसेची राहावे, चित्ती असू द्यावे समाधान.'' हे आपल्याला कळते पण वळत नाही आणि आपला सुखाचा आणि समाधानाचा शोध सुरूच राहतो. प्रत्येक परिस्थितीत आपली सुखाची आणि समाधानाची व्याख्या बदलत जाते. मला नोकरी लागली म्हणजे मी सुखी होईल, माझ्या पगारात वाढ झाली म्हणजे मी सुखी होईल, माझ्याकडे आज जी चारचाकी आहे, उद्या त्यापेक्षा आणखी चांगल्या प्रकारचे वाहन आले म्हणजे मला समाधान लाभेल. आणखी जमीन, आणखी घरे, बंगले यासारख्या गोष्टी माणूस मिळवण्यासाठी माणूस धडपड करतो आणि त्यासाठी आयुष्यभर धाव धाव धावतो. परंतु त्याची हाव संपत नाही. कुठे थांबायचे हे त्याला कळत नाही.



एका शेतकऱ्याची गोष्ट फार सुंदर आहे. तो आपल्या शेताच्या बांधावर आरामात झोपला होता. त्याची एका मोक्याच्या ठिकाणी शेतजमीन होती. शहरातून आलेला एक कारखानदार ती जमीन विकत घेऊन तिथे कारखाना काढण्याच्या तयारीत होता. तो त्या शेतकऱ्याला म्हणाला ,''तू मला ही जमीन दिलीस तर मी तुला भरपूर पैसे देईन. तू श्रीमंत होशील.'' शेतकऱ्यांनी विचारले,''भरपूर पैसे मिळाल्यावर आणि श्रीमंत झाल्यावर काय होईल ?'' जमीनदार म्हणाला,''वेडा आहेस का ?अरे, तू अत्यंत समाधानात राहशील.'' शेतकरी म्हणायला,''मग त्यासाठी जमीन विकायची काय गरज आहे ? मी आत्ता देखील समाधानीच आहे.'' एका सामान्य शेतकऱ्याला जी गोष्ट कळली ती आपल्याला कळत नाही.

परमेश्वर प्राप्तीच्या आड जर काही येत असेल तर ते म्हणजे आपले मन ! आपले मन अतिशय चंचल आहे आणि ही गोष्ट सगळ्यांनाच माहिती आहे. म्हणून तर एका गाण्यात म्हटले आहे, '' माझिया मना जरा जरा थांब ना, तुझे धावणे अन् मला वेदना !'' म्हणून समर्थ म्हणतात की आपले हे चांचल्य म्हणजे चंचलता भगवंताला अर्पण करून आपली चित्त त्याच्याकडे केंद्रित करावे. त्याचे ध्यान लागावे.


गीतेत भगवंत म्हणतात ''सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज'' सर्वधर्म म्हणजे आपली सुखदुःखे, कर्म, वासना आदी सगळे भगवंताला अर्पण करून त्याला शरण जावे. तो आनंदनिधान आहे. अक्षय सुख आणि समाधान त्याच्याच ठायी आहे.

स्वसंवाद : १) मी ज्या सुखाच्या शोधात धावत आहे, ते खरोखरच मला समाधान देणारे आहे का? की ही केवळ अंतहीन धावपळ आहे?

२) माझ्या मनातील चंचलता, अपेक्षा आणि असंतोष मी कधी परमेश्वराला अर्पण करण्याचा प्रयत्न केला आहे का?

३) ''समाधान'' ही बाह्य गोष्टींमध्ये नसून अंतर्मनात आहे हे मला खरेच पटले आहे का?

(क्रमशः)




## || संजय उवाच... ||




@संजय काव्या पुणे 7743918559

✍️ विचार

विचार हा माणसाची बुद्धिमत्ता ठरवितो आणि विचार हे संस्कारातून येतात, घडणे व बिघडणे याला कारणीभूत विचार असतात म्हणून विचार नेहमी चांगलेच असावेत. विचाराची श्रीमंती पैशापेक्षा मोठी आहे.

# अखंड नामस्मरणात राहणे म्हणजेच उपासना



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

देवाच्या आड काय बरे येत असते ? आपल्याला देवाची प्राप्ती होत नाही याला वास्तविक आपणच कारण असतो. आपण लोकांना त्याबद्दल दोष देत असतो, पण इतर लोक त्याच्या आड येत नसून आपण स्वत:च आड येत असतो, हे थोडा विचार केला असताना समजून येईल. ज्याला आपले म्हणायला पाहिजे होते त्याला आपले न म्हणता, आपण दुसऱ्या कुणाला तरी आपले म्हणत असतो. आपला मुलगा, बायको, भाऊ, या सर्वांना आपले म्हणत असतो. हे सर्वजण काही मर्यादेपर्यंत आपले असतात. परंतु देवाला जर आपण आपले म्हटले, तर तो सदासर्वकाळ आपलाच असतो, आणि आपल्याला तो मदत करायला तयार असतो. तुम्हा सर्वांना द्रौपदीची गोष्ट माहीत आहे ना ? आपले भ्रतार आपले रक्षण करतील असे तिला वाटत होते. परंतु त्या कोणाकडून काही होणे शक्य नाही असे तिला दिसले, तेव्हा तिने अनन्यतेने श्रीकृष्णाचा धावा केला आणि तेव्हाच श्रीकृष्ण तिच्याकरिता धावून आले. म्हणजे काय, की आपण ज्याला आपले म्हणत असतो ते खरे आपले नसतात. आपण परमात्म्याला आपले म्हणावे, ' मी त्याचा आहे ' अशी सदासर्वकाळ आठवण ठेवावी, आणि जे जे घडत असते ते ते सर्व त्याच्याच इच्छेने होत असते ही भावना ठेवावी. अशी भावना होण्याकरिता आपण त्याची उपासना करायला पाहिजे. उपासना करणे म्हणजे तरी काय ? आपण देवाचे आहोत, आपण नेहमी त्याच्या सान्निध्यात आहोत, असे वाटणे. असे वाटण्याकरिता त्याच्या नामस्मरणात राहणे जरूर आहे. आपण त्याच्या नामस्मरणात राहिलो म्हणजे तो सदासर्वकाळ आपल्याजवळ राहतो. तुम्ही कुणाचे नाव घेतले म्हणजे त्याची मूर्ती जशी तुमच्या ध्यानात येते, त्याप्रमाणे देवाचे नाव घेतले म्हणजे तो तुमच्याजवळ असतो. देव कसा आहे हे विचारले तर कसे सांगता येईल ? तो नामात आहे हे प्रत्यक्ष श्रीकृष्णांनीच सांगितले आहे. नाम हे त्याचे रूप. म्हणून, नामस्मरण केले म्हणजे देवाला तुमच्याजवळ येणेच भाग पडते. हे नामस्मरण कसे करावे ? समर्थांनी सांगितले आहे की, ' काहीच न करूनि प्राणी । रामनाम जपे वाणी । तेणे संतुष्ट चक्रपाणी । भक्तालागी सांभाळी ।। ' आपण नाम घेताना काहीच करीत नाही का ? आपण त्या वेळी संसाराची काळजी करीत असतोच ना ? म्हणजेच त्या वेळी आपण आपला मीपणा ठेवून नामस्मरण करीत असतो ! मीपणारहित जो नामस्मरण करील त्यालाच देव सांभाळीत असतो; आणि जो स्वस्थ राहील त्याचा योगक्षेम देव चालवीत असतो.

आपण कोणाचे तरी होऊन राहावे.; गुरूचे तरी किंवा देवाचे तरी.

***

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर, पुणे

### संत भानुदास



मनाची उन्मनी अवस्था समाधी ध्यान यातील सुख हे अवर्णनीय असते, पण भक्तासाठी त्याचे सगुण रुप दर्शनही तितकेच, किंबहुना अधिक महत्त्वाचे असते. केव्हा एकदा पंढरीस जातो आणि त्या मोहक पांडुरंगाचे रूप न्याहाळतो अशी अधीरता भक्तास झाल्या वाचून राहत नाही. पांडुरंगाचे रूप मनात साठवावे तरिही ती तृष्णा कमी होत नाही. कितीही रुप न्याहाळले तरी मन भरत नाही. पण आनंद मात्र अवर्णनीय असतो. असे रूप दृष्टीस पडले तो दिवसच दिवाळी दसऱ्या पेक्षा काय कमी मोलाचा आहे?

नाही प्रेम भाव नकळे मान्यता/
सलगी बोलता सुख वाटे//
अखंड नामावळी गाईन वेळोवेळी/
नित्य ती दिवाळी आम्हा घरी//




✍️वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### संस्कृती व मूल्यांचे शिक्षण

शिक्षणाने माणूस सुधारतो विकास होतो. आपण कोण, आपले कार्य, आपले राष्ट्र याचा तो विचार करतो... पण नुसते पुस्तकी शिक्षण नकोतर जीवनमुल्ये देणारे ते पाहिजे. श्रध्दा निर्भयता माणूसकी सात्विकता, अहिंसा दया
शील व करूणा त्या शिक्षणातून मिळाली व मूल्ये मिळाली तर किती चांगले नाही का? म्हणून विवेकानंद राधाकृष्णन व अनेक तत्वज्ञ विचारवंत यांनी मूल्यशिक्षण हवे हे आवर्जून सांगितलं. मन मनगट व मस्तक यांचा विकास झाला पाहिजे. माणूस हा सामाजिक प्राणी आहे, पशू नाही ईतरापेक्षा वाणी व विचार माणसाला वेगळे करतात. प्रक्षोभक वृत्ती अराजकते मुळे हतबल होतो. म्हणून मूल्यशिक्षण! सत्य, प्रेम बोध, दयाध्यान, एकाग्रता, मानवता व देश समाजप्रती प्रेम ही मूल्ये जागृत होऊन तो जीवनध्येय साध्य करू शकतो. म्हणून माणसा माणसा तू कधी होशील माणूस.यासाठी आधुनिक जगात लहान वयापासून, ते शालेय जीवनात" मूल्यशिक्षण दिले गेले पाहिजे. भारतीय संस्कृतीपरंपरा, अध्यात्म व मूल्ये याची जाण करून देणे पोहचविणे हे दक्ष राहून करा.
तुर्त थांबतो गूडडे गूड मार्निंग आपला दिवस आनंदी जावो.
आवडले तर लाईक करा, शेअर करा. वाचत राहा सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे.




# कशासोबत काय खावे

ज्योतिर्मय साहित्य

जेसी इंचास्पे सांगतात की, कर्बो दकांना (कार्बस) नेहमी प्रथिनांचे किंवा स्निग्ध पदार्थांचे कपडे घालावेत. भातावर जेव्हा आपण तूप घेतो, तेव्हा त्यातील फॅट्समुळे भातातील साखरेचे रक्तात मिसळण्याचे प्रमाण संथ होते. यामुळे रक्तातील साखरेचा स्पाईक टाळता येतो.

भारतात अशा अनेक पारंपारिक खाण्याच्या पद्धती आहेत, ज्या विज्ञानाच्या कसोटीवर आणि ग्लुकोज गॉडेसच्या नियमांना अगदी तंतोतंत पाळतात. कार्बोदकांसोबत प्रथिने आणि स्निग्ध पदार्थांची जोड दिल्याने रक्तातील साखरेची पातळी कशी नियंत्रित राहते, याची काही उत्तम उदाहरणे खालीलप्रमाणे आहेत:

१. बाजरीची भाकरी आणि पिठलं किंवा लसणाची चटणी

विज्ञान: बाजरीमध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते. जेव्हा आपण ती पिठल्यासोबत (बेसन - प्रथिने) आणि पांढऱ्या लोण्यासोबत किंवा तेलासोबत खातो, तेव्हा त्यातील फायबर, फॅट्स आणि प्रोटीन्स एकत्रितपणे ग्लुकोज स्पाईक रोखतात.

२. पुरणपोळी आणि साजूक तूप

विज्ञान: पुरणपोळीमध्ये डाळ (प्रथिने) आणि गूळ असतो. जेसी यांच्या नियमानुसार, गोड पदार्थ खाताना त्यावर साजूक तूप घेतल्यास, तुपातील स्निग्ध पदार्थ साखरेच्या शोषणाचा वेग कमी करतात. म्हणूनच पुरणपोळी तुपाशिवाय खाणे शरीरासाठी जास्त स्पाईक देणारे ठरू शकते.

३. इडली-डोसा आणि सांबार-चटणी

विज्ञान: तांदूळ आणि उडदाच्या डाळीचे मिश्रण आंबवले () जाते, ज्यामुळे ते पचायला हलके होते. सांबारमधील भरपूर भाज्या (फायबर) आणि डाळ (प्रथिने), तसेच चटणीमधील खोबरे (फॅट्स) तांदळाच्या ग्लुकोज स्पाईकला संतुलित करतात.

४. मुगाच्या डाळीची खिचडी आणि दही

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

विज्ञान: खिचडीमध्ये तांदळासोबत डाळीचे प्रमाण जास्त असते. त्यासोबत जेव्हा आपण दही (प्रथिने आणि प्रोबायोटिक्स) घेतो, तेव्हा जेवणाचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी होतो. दह्यातील आंबटपणा लिंबासारखाच परिणाम करतो.

५. थालीपीठ आणि लोणी/दही

विज्ञान: थालीपीठ हे भाजणीपासून बनवले जाते, ज्यात अनेक प्रकारची धान्ये आणि कडधान्ये असतात. यात कांदा, कोथिंबीर आणि पालेभाज्या घातल्यामुळे फायबरचे प्रमाण वाढते. लोण्यासोबत खाल्ल्याने ते एक संतुलित जेवण ठरते.

काही महत्त्वाच्या टिप्स (भारतीय संदर्भात):

पालेभाज्यांची सुरुवात: जेवण सुरू करताना आधी वाटीभर पालेभाजी किंवा कोशिंबीर खाण्याची पद्धत (उदा. मेथीची भाजी किंवा काकडीची कोशिंबीर) ग्लुकोज नियंत्रणासाठी सर्वोत्तम आहे.

ताक: जेवणानंतर किंवा जेवताना ताक पिणे हे साखरेची पातळी स्थिर ठेवण्यास आणि पचन सुधारण्यास मदत करते.

कडधान्ये: उसळ किंवा मोड आलेली कडधान्ये जेवणात समाविष्ट केल्याने प्रथिनांचा कोटा पूर्ण होतो, जो ग्लुकोज गॉडेसच्या मते अत्यंत आवश्यक आहे.

भारतातील भौगोलिक परिस्थितीनुसार बदलणाऱ्या या आहारात संतुलन हाच मुख्य मंत्र आहे.

(क्रमशः)

## प्रभातपुष्प

### षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### पहिला पाऊस

पहिल्या पावसात भिजल्यावर
आनंद मज होऊनी
सर्वांग माझे शहारते
लहानासवे मजेने मी
बनवलेली कागदी नाव
पाण्यावर छान तरंगते

वीजांचा गडगडाट होवून
पहिला पाऊस येताच
वर्षा आनंदाची होते
शिवारी वृक्ष-वेली पहा
नवचैतन्याने ही झुलताना
हिरवळ चोहीकडे दाटते

# जागतिक नेत्रदान दिन

**ज्योतिर्मय साहित्य**

आज १० जून, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो. अनेक अंध व्यक्तींचे जीवन प्रकाशमान करणारे सुप्रसिद्ध नेत्र विशारद डॉ. रामचंद्र लक्ष्मण भालचंद्र यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १० जून हा दिवस जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो. डोळ्यात दाटलेल्या काळ्याकुट्ट अंधारातून उद्याच्या उज्ज्वल भविष्याची स्वप्ने पाहणाऱ्या व्यक्तींना नेत्रदानाच्या माध्यमातून हे जग सुंदर आहे याची प्रचिती देण्याची प्रेरणा हा दिवस आहे. शासकीय सेवेत नेत्रचिकित्सक म्हणून अहोरात्र झटणाऱ्या डॉ भालचंद्र यांचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात अजरामर आहे. त्यांचा जन्म उस्मानाबाद जिल्ह्यात १० जून १९२४ रोजी झाला. घरची परिस्थिती हलाखीची असूनही जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी शिक्षण पूर्ण करून नेत्र विशारद पदवी मिळवून ८० हजारांहून अधिक शस्त्रक्रिया केल्या. १० जून १९७९ ला त्यांचे निधन झाले. या दिवसाचे औचित्य साधून लोकांमध्ये नेत्रदानाविषयी जनजागृती करून लोकांना मृत्यूनंतर डोळे दान करण्यास प्रवृत्त करणे हे या दिवसाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे. आपल्या आयुष्यात डोळ्यांचे किती महत्व आहे हे आपण जाणतोच. जगातील सर्व सुंदर गोष्टी आणि सुंदर जगाचा आनंद आपण डोळ्यांमुळेच घेऊ शकतो. डोळ्यांशीवाय जगण्याची कल्पनाही कोणी करू शकत नाही. डोळे हे आपल्या शरीरातील सर्वात महत्वाचे ज्ञानेंद्रिय आहे. डोळ्यांद्वारे आपल्याला ७५ टक्के ज्ञान मिळते. सध्याचा काळात बदलणारी जीवनशैली, अनियमित दिनचर्या, प्रदूषण आणि वाढलेला मानसिक तणाव यामुळे बहुतेक लोकांना डोळ्यांच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. काहींना हा त्रास लहानवयातच होतो तर काहींना वयाच्या मध्यकाळात होतो. काही



असेही दुर्दैवी असतात की ज्यांच्या आयुष्यात कायमचा अंधार असतो. त्यांना दृष्टीच नसते. जन्मतःच ते दृष्टिहीन असतात. तर काही जण अपघातात आपले डोळे गमावतात. जगभरात दृष्टिहीन लोकांची संख्या जास्त आहे. अशा अंधारलेल्या लोकांच्या आयुष्यात नेत्रदानाने प्रकाश आणता येतो. त्यासाठी नेत्रदानाचे महत्व लक्षात घेऊन जग न पाहिलेल्या व्यक्तींना नेत्रदान करुन त्यांना हे सुंदर जग पाहण्याची संधी देणे ही काळाची गरज आहे. भारतामध्ये असलेल्या कायद्यानुसार नेत्रदान हे मरणोत्तर करावे. हे नेत्रदान चष्मा असणारे, मोतीबिंदूची शस्त्रक्रिया झालेले तसेच मधुमेह आणि मानसिक त्रास असलेले व्यक्तीही करू शकतात. नेत्रदान करण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तींनी जवळच्या नेत्रपेढीत जाऊन नेत्रदानाची नोंद करावी.

**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे

मृत व्यक्तीने नेत्रदानाची नोंद केली नसली तरी त्या व्यक्तीच्या वारसदारांनी इच्छा व्यक्त केली तरी त्या व्यक्तीचे नेत्रदान होऊ शकते. मृत्यूनंतर जास्तीतजास्त सहा तासाच्या आत नेत्रदान होऊ शकते. ज्या व्यक्तीला नेत्रदानासाठी कॉर्नियाचा वापर करायचा आहे त्याला चोवीस तासाच्या आत कॉर्नियाचे प्रत्यारोपण करणे गरजेचे असते. नेत्रदानाचा अर्थ शरीरातून संपूर्ण डोळा काढून घेणे असा होत नाही. यात मृत व्यक्तीच्या डोळ्याचा कॉर्नियाचा वापर करण्यात येतो. एका मृत्यू झालेल्या व्यक्तीचे डोळे एका नेत्रहीन व्यक्तीला देण्यात येते त्यामुळे त्या अंध व्यक्तीचे जीवन तर प्रकाशमान होतेच पण मृत व्यक्ती मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहू शकते. आज जागतिक नेत्रदानाच्या दिवशी नेत्रदानाचा संकल्प करूया, मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहूया.

# फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज् ऑफ वेस्टर्न रीजनच्या स्वीकृत सदस्यपदी शिरिष चिटणीस



**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - चित्रपटविषयक चळवळ गतिमान करण्यासाठी अनेक उपक्रम राबवणाऱ्या फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज् ऑफ वेस्टर्न रीजनच्या स्वीकृत सदस्यपदी ज्येष्ठ चित्रपट अभ्यासक आणि लेखक शिरिष चिटणीस यांची निवड करण्यात आली.

फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज् ऑफ वेस्टर्न रीजनच्या पुण्यात झालेल्या मिटींगमध्ये ही निवड करण्यात आली. शिरिष चिटणीस हे ज्येष्ठ लेखक असून त्यांच्या दिपलक्ष्मी पतसंस्थेच्या माध्यमातून ते विवीध चित्रपटविषयक आणि साहित्यविषयक उपक्रम राबवत असतात.फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज् ऑफ वेस्टर्न रीजन या संस्थेच्या माध्यमातून आता अधिक चांगले उपक्रम राबवता येतील असा मनोदय त्यांनी व्यक्त केला. फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज् ऑफ वेस्टर्न रीजनच्या याच मिटींगमध्ये कार्यकारीणीचे १२ सदस्य व ७ स्विकृत सदस्यांची देखील निवड २०२६-२८ या कालावधिसाठी करण्यात आली

फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज ऑफ वेस्टर्न रीजनच्या कार्यकारीणीवर निवड झालेल्या सदस्यांचा तपशील पुढील प्रमाणे : किरण व्ही. शांताराम (अध्यक्ष), मुंबई, वीरेंद्र चित्राव (उपाध्यक्ष), पुणे, संदिप मांजरेकर (सचिव), मुंबई, दिलीप बापट (कोषाध्यक्ष), कोल्हापूर, जितेंद्र पाटील (विभागीय सचिव), लातूर, डॉ. सुनिल पुणतांबेकर (सदस्य), डोंबिवली, राजभूषण सहस्त्रबुध्दे (सदस्य), सातारा, हेमंत बेळे (सदस्य), नासिक, डॉ. नवनीत तोष्णीवाल (सदस्य), सोलापूर, विनित जोशी (सदस्य), जळगांव, राजेंद्र तालक (सदस्य), मडगांव-गोवा, ऋता धर्माधिकारी (सदस्य), नागपूर

स्विकृत सदस्य : शिरीष चिटणीस, सातारा, सतीश जकातदार, पुणे, अमित चव्हाण, मुंबई, सचिन चट्टे, पणजी-गोवा, मयुर कुलकण, कोल्हापूर, सुधीर मुळे, रत्नागिरी

कार्यालयीन सचिव : प्रणव साळगांवकर, ठाणे

या बैठकीत चित्रपट चळवळ जोमाने पुढे नेण्याचा निर्धार करण्यात आला. फिल्म सोसायटी चळवळीचा काळ हा आव्हानात्मक आहे,परंतू ओ.टी.टी. प्लॅटफॉर्ममुळे निराश झालेला रसिक आगामी काळात मोठ्या प्रमाणात पुन्हा आपल्या चळवळीकडे येईल यात शंकाच नाही. फिल्म सोसायटी चळवळ जास्तीत जास्त तरूणाभिमुख होईल या दृष्टीने प्रयत्न प्रयत्न करावे लागतील. त्या प्रमाणे कार्यक्रमांची रचना करावी लागेल. प्रत्येक जिल्ह्यात पाच कॉलेज फिल्म क्लब हे आपले ध्येय असून त्यासाठी आपण पुढील २ वर्षात कार्यरत राहण्याचा निश्चय करण्यात आला.



# पिंपळे सौदागरमध्ये ''प्लास्टिक मुक्त'' अभियान

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकिर्दीच्या तपपुर्ती निमित्त रहाटणी - पिंपळे सौदागर भाजपा मंडलच्यावतीने पवना नदीकाठ परिसरातील प्लास्टिकच्या पिशव्या, बाटल्या आणि कचरा गोळा करुन परिसराची स्वच्छता करण्यात आली. मंगळवार दि. ९ जून रोजी सकाळी अकरा वाजता आयोजित करण्यात आलेल्या या अभियानात पवना नदीकाठी असलेल्या महादेव मंदिर तसेच खंडोबा मंदिराच्या परिसरातही यावेळी स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. या स्वच्छता अभिनयात पिंपळे सौदागर येथील नगरसेविका अनिता काटे तसेच संदिप काटे, मंडल अध्यक्ष सोमनाथ तापकिर, जयनाथ काटे, भरत काटे, संदेश काटे, मनोज ब्राह्मणकर, रेखा काटे , अनिता चोपडे, कल्पना बागूल, अशोक वारकर, सुरेश मोरे, रमेश काळे आदींनी सहभाग दर्शविला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कल्पनेतील स्वच्छ भारत ही संकल्पना प्रत्यक्षात अंमलात आणण्याच्या दृष्टीने आपण ज्या भागात वास्तव्यास आहोत तो परिसर स्वच्छ ठेऊन योगदान दर्शवावे या भूमिकेतून हे अभियान असल्याची प्रतिक्रिया अनिता काटे यांनी यावेळी व्यक्त केली. तर रहाटणी - पिंपळे सौदागर भाजपाचे मंडल अध्यक्ष सोमनाथ तापकिर यांनी आयोजनाची भूमिका विषद करताना विश्वास, विकास आणि जनकल्याण या माध्यमातून साकारलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तपपुर्ती कारकिर्दिनिमित्त ''प्लास्टिक मुक्त भारत'' या अभियानाव्दारे परिसर स्वच्छतेचा संदेश लोकांपर्यंत पोहोचवण्याचा हा प्रयत्न असल्याचे सांगितले.

# चौका शिवारात ११ जूनला रंगणार तिफण मृगोत्सव

## हिरवं सपन फुलवणारा शेतीमातीचा शब्दोत्सव

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - शेती, भाषा, साहित्य आणि संस्कृतीचा संगम घडवणारा तिफण मृगोत्सव ११ जून २०२६ रोजी गुरुवार सकाळी ११ वाजता चौका घाटाजवळील शेतात आयोजित करण्यात आला आहे. त्रैमासिक तिफण आणि भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद, सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समिती यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम होणार आहे.

हिरवं सपन फुलवणारा शेतीमातीचा शब्दोत्सव या उद्देशाने आयोजित केलेल्या या मृगोत्सवात पारंपरिक तिफण पूजन आणि प्रात्यक्षिक पेरणी शेतकऱ्यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर औपचारिक उद्घाटन करण्यात येईल.

कार्यक्रमात शेतकरी, साहित्यिक आणि कृषी तज्ज्ञ विचारांची पेरणी या सत्रात मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी त्रैमासिक तिफणचा विशेषांक प्रकाशित केला जाणार असून, एका कष्टकरी शेतकऱ्याचा विशेष सन्मान केला जाणार आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी आणि प्रश्नांवर थेट संवाद साधण्याची संधीही उपस्थितांना मिळणार आहे.

उत्सवाचा प्रमुख आकर्षण शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे शेतकरी काव्य परिषद निमंत्रितां चे कविसंमेलन ठरणार आहे. सुप्रसिद्ध कवी व पोशिंदाकार सुनील डोके यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कविसंमेलनात अशोक शेवगण, संजय घोगरे, नागेश बोनतेवाड, संजय खाडे, मनोज खुटे, संदीप ढाकणे, वृषाली सोनवणे, दिपाली देवरे आणि प्रकाश साळवे यांसह अनेक निमंत्रित कवी सहभागी होणार आहेत.

याशिवाय संत भगवान बाबा कलामंच, चौका यांच्याकडून प्रबोधनात्मक पर्यावरण जागृतीपर कार्यक्रम सादर केला जाणार आहे.

तिफण म्हणजे मातीत बी, मनात विचार ही संकल्पना घेऊन आयोजित केलेल्या या मृगोत्सवात शेतकरी, साहित्यिक, विद्यार्थी आणि निसर्गप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजक प्रा. डॉ. शिवाजी हुसे, डॉ. सर्जेराव जिगे आणि रामभाऊ डोंगरे यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी प्रा. डॉ. शिवाजी हुसे यांच्याशी मो. ९४०४०००३९८ वर संपर्क साधावा, असे संयोजकांनी कळवले आहे.

**सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....**



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

**Dr Shaikh A H - 98606 99906**

## आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या युगात भारताची वाटचाल

ॲड.प्रा. कौशिक म. हरणे. मो.- 96731 75197








पुढे......

ओपन-एआय, गूगल, मायक्रोसॉफ्ट, एनव्हिडिया आणि मेटा यांसारख्या कंपन्यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या विकासाला अभूतपूर्व गती दिली आहे. चीन दुसऱ्या क्रमांकावर असून आर्टिफिशियल इंटेलिजन्स, रोबोटिक्स, क्वांटम कॉम्प्युटिंग आणि स्वयंचलित उत्पादन क्षेत्रात वेगाने प्रगती करत आहे. जपान तिसऱ्या क्रमांकावर असून अनेक नाविन्यपूर्ण आर्टिफिशियल इंटेलिजन्स स्टार्टअप्स आणि संशोधन उपक्रमांना आर्थिक पाठबळ देत आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाचा पाया म्हणजे संगणकीय क्षमता, डेटा आणि सेमीकंडक्टर चिप्स असून या चिप्सशिवाय आर्टिफिशियल इंटेलिजन्स अस्तित्वातच येऊ शकत नाही. जगातील सर्वात प्रगत सेमीकंडक्टर चिप्सचे उत्पादन तैवानमध्ये होते. दुसरीकडे, आर्टिफिशियल इंटेलिजन्स प्रणालींसाठी आवश्यक असलेल्या उच्च क्षमतेच्या मेमरी आणि स्टोरेज तंत्रज्ञानामध्ये दक्षिण कोरिया जगाचे नेतृत्व करत आहे. त्यामुळे या दोन्ही देशांनी जागतिक तंत्रज्ञान साखळीत अत्यंत महत्त्वाचे स्थान मिळवले आहे.तसा भारताचा प्रवासही प्रेरणादायी राहिला आहे. सन २००० च्या सुमारास भारत जागतिक बाजार मूल्यांकनात पंधराव्या क्रमांकावर होता. Y2K संकट आणि त्यानंतरच्या डॉट-कॉम क्रांतीने भारतीय आयटी उद्योगाला अभूतपूर्व संधी उपलब्ध करून दिली. भारतीय अभियंते, सॉफ्टवेअर व्यावसायिक आणि उद्योजकांनी त्या संधीचे रूपांतर यशोगाथेत केले. इन्फोसिस, टीसीएस, विप्रो, एचसीएल आणि टेक महिंद्रा यांसारख्या कंपन्यांनी भारताला जागतिक आयटी महासत्ता म्हणून ओळख मिळवून दिली. या तंत्रज्ञान क्रांतीचा परिणाम केवळ आयटी उद्योगापुरता मर्यादित राहिला नाही. गुरुग्राम, हैदराबाद, बेंगळुरू, पुणे, नोएडा आणि चेन्नई यांसारख्या शहरांनी जागतिक दर्जाची आर्थिक केंद्रे म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली. रिअल इस्टेट, शिक्षण, आरोग्यसेवा, वाहतूक, हॉस्पिटॅलिटी आणि सेवा क्षेत्रातील असंख्य उद्योगांना या प्रगतीचा लाभ झाला. २०१० पर्यंत भारताने दहाव्या क्रमांकावर झेप घेतली आणि पुढील दशकात वेगवान आर्थिक वाढ साधत २०२२-२३ मध्ये चौथ्या क्रमांकापर्यंत मजल मारली.मात्र, आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या नव्या युगात भारताने अपेक्षित वेगाने पाहिजेत तशी पावले उचलली नाहीत. भारताची मुख्य ताकद म्हणजे प्रचंड प्रमाणात उपलब्ध असलेले कुशल मनुष्यबळ. परंतु हल्लीच्या काळात जनरेटिव्ह आर्टिफिशियल इंटेलिजन्स, ऑटोमेशन आणि मशीन लर्निंगमुळे पारंपरिक सॉफ्टवेअर सेवांच्या स्वरूपात आमूलाग्र बदल होत आहेत.

क्रमशः..... पुढील भाग उद्याच्या अंकात



## मुलांसाठी लघु बोधकथा

### ♦विश्वासाला तडा♦



एका लोककथेनुसार राम नावाच्या एका माणसाकडे एक उमदा आणि सुंदर घोडा होता. तो त्या घोड्याची काळजी घ्यायचा. त्यामुळे त्या दोघांचेही एकमेकावर प्रेम जडलेले होते. शाम नावाच्या एका घोड्याच्या व्यापा-याने तो घोडा पाहिला आणि त्याला तो घोडा फारच आवडला. शामने तो घोडा मिळविण्याचे कारस्थान रचले.


शामने रामच्या रोजच्या येण्याजाण्याच्या रस्त्यावर भिका-याचे सोंग घेतले व आजारी असल्याचे नाटक करत बसला. दुसरीकडून राम घोड्यावर बसून येत होता तेव्हा शाम जोरजोराने विव्हळू लागला, गयावया करू लागला. रामने ते पाहिले व तो शामपाशी थांबला. शाम रामला म्हणाला,"मी आजारी आहे मला तुझ्या घोड्यावरून पुढच्या गावापर्यंत नेशील का," रामला त्याची दया आली, त्याने त्याला घोड्यावर बसविले, आणि स्वतः पायी चालू लागला. थोडे पुढे जाताच शाम त्याचा घोडा घेऊन पुढे गेला व त्याने पुढील गावी जाऊन तो घोडा विकून टाकला. दुस-या दिवशी शाम रामकडे आला व म्हणाला," अरे मी तुझा घोडा जर विकत मागितला असता तर तू मला तो दिला नसतास म्हणून मला आजारी भिका-याचे सोंग घ्यावे लागले." यावर राम शांतपणे शामला म्हणाला," मित्रा, मी तुला मदत केली होती ही गोष्ट तू इथून पुढे कोणालाही सांगू नकोस कारण तुझी ही गोष्ट ऐकल्यावर जगात कोणीच गरीबांना, गरजूंना मदत करणार नाही. विश्वासघात करणे महापाप आहे"

तात्पर्यः- गरजूला मदत करण्यापूर्वी तो खरेच गरजवंत आहे याची खात्री करणे सूज्ञपणाचे ठरते.

## झाडीबोली भाषेविषयी दोन शब्द.....



अनिल मुनघाटे, सी वुड्स नवी मुंबई, मो. 9404081401





संगीता ठलाल आपला "रानभाज्यांच्या जगात" आणि "झाडीचा खाजा" मिळाला. दोन्ही पुस्तकं छान आहेत. झाडीचा खाजा विशेष आवडला. अस्सल झाडी बोलीत जो गोडवा आहे तो खरच खाजा आहे. हा खाजा हाती धरूनच माझे बालपण पुढे सरकत गेले. आता जरी मुंबईत असलो तरी याची गोडी अजूनही माझ्या जीभेवर आहे. आता मात्र हा खाजा आपल्या झाडीतच दुर्मिळ झाला आहे. त्यात आता बरीच भेसळ झाली आहे. ती आपणच होऊ दिली आहे. बाहेरची माणसं त्यांची तथाकथित शुद्ध वगैरे भाषा घेऊन झाडीत येऊन बसली. आणि तेव्हापासून आपली झाडी बोली आपल्यापासून दूर गेली. अगदी आपल्या माजघरातून सुद्धा. खरं तर आपण झाडीवंतच दूर गेलो. यात आपलीच अशी चूक झाली की त्यांची भाषा ती शुद्ध आणि आपली अशुद्ध या गैरसमजातून आपण आपला गोड खाजा हरवून बसलो. दुसरे असे की साहित्य, लिखाण, कथा - कविता वगैरे पुण्या मुंबईचे ते खरे साहित्य असा भाबडा समज अनेक वर्षे आपण बाळगून होतो. त्यामुळे काही मोजके अपवाद सोडता झाडीवंतांचे साहित्य पुस्तक रूपाने पुढे नाही येऊ शकले. जे आले त्यालाही आपल्या झाडीत प्रतिष्ठा मिळण्यासाठी संघर्ष करावा लागला. पण आताचे आशादायी चित्र पाहिल्यावर आनंद वाटतो. या आनंदात तुमच्या दोन्ही पुस्तकांनी भर घातली आहे. मी गावाकडे येतो, गावांमध्ये फिरतो तेव्हा हा खाजा पुन्हा चाखायला मिळतो. तेव्हा सीमग्याच्या गाठीची आठवण होते.

दुसरी आनंदाची गोष्ट अशी की इकडल्या साहित्यिक मेळाव्यात मी आपल्या झाडी बोलीचा नेहमी उल्लेख करत असतो. त्यामुळे आता पुणे मुंबईच्या वाचकांमध्येही झाडी बोली बद्दल उत्सुकता लागून आहे. अलीकडे साहित्याबद्दलचा आणि प्रमाण मराठी भाषेबद्दलचा एक विशिष्ट असा समज बदलताना दिसत आहे. अनेक ठिकाणच्या बोली भाषेतील साहित्याला एक वेगळे महत्त्व आले आहे. आम्ही राहतो त्या भागात दर महिन्याला एक कवी संमेलन होते. पुढील महिन्यात मी झाडाचा खाजामधील काही कविता सादर करायचे ठरवले आहे.

तुमच्या सगळ्या कविता छान आहेत. मनाला भिडणाऱ्या आहेत. आपले स्वतःचे वेगळेपण जपणाऱ्या आहेत. कारण त्या कुठलीही सरमिसळ न करता आपले अस्सल रूप घेऊन उतरल्या आहेत हे महत्त्वाचे आहे.

बोरिंग ही कविता तर खूप काही सांगून जाते. भूगर्भाच्या तळाशी असलेले पाणी बोर विहिरीच्या पंपाने आपल्या घागरीच्या मुखाशी आणण्यासाठीचा स्त्रियांचा संघर्ष केवळ रोजच्या जगण्यातला संघर्ष न राहता बोरिंग मधून स्त्रियांच्या अव्यक्त मनातील भावना ते पाणी वर घेऊन येते.

सगळ्याच कवितांमधून असा एक वेगळा आशय वर येत राहतो.

झाडीबोलीतील वाक्यांचे आणि शब्दांचे स्वतःचे असे एक रूप आहे. आपले बहुत्येक शब्द आकारांत आहेत. उदा. 'मातीचं' हा शब्द आपण मातीचा असा वापरतो. भांडं न म्हणता भांडा म्हणतो. काही कवितांमध्ये अशा गोष्टी राहून गेल्या आहेत असं मला वाटते. तसेच "कोवरं, काचं, आंबं "हे वाक्य "कोवराकच आंबा" असे तर नाही ना?

कदाचित तुम्हाला त्यातून आणखी काही वेगळे प्रतीत करायचे असल्यास हरकत नाही.

तुमच्या पुढील लिखाणातून झाडी बोलीला अशीच प्रतिष्ठा मिळो आणि तुमचे अधिकाधिक लेखन प्रकाशित होत राहो ही सदिच्छा..

# अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने आणि सातारा

**ज्योतिर्मय साहित्य**

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने आतापर्यंत चार साताऱ्यात संपन्न झालेली आहेत. पहिले संमेलन १८७८ साली मराठी ग्रंथकारांचे संमेलन म्हणून पुणे येथे संपन्न झाले. त्याचे शिल्पकार होते सर्वज्ञः स.हि. माधव असा गौरव ज्यांचा लोकमान्य टिळकांनी केला ते न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे. या संमेलनात लोकहितवादींचाही सहभाग होताच. दुसरे मराठी साहित्य संमेलन १८८५ साली पुण्यातच कृष्णशास्त्री राजवाडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या मराठी साहित्यसंमेलना नंतर मोठा खंड साहित्य संमेलनामध्ये पडला. पुढील संमेलनासाठी सातारकरांनाच पुढाकार घ्यावा लागला. तिसरे मराठी साहित्य संमेलन १९०५ साली सातारा येथे रघुनाथ पांडुरंग तथा दादासाहेब करंदीकर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले. ॲड. दादासाहेब करंदीकर हे लोकमान्य टिळक यांचे वकील आणि सल्लागार. त्याकाळात स्वातंत्र्यलढ्यामध्ये पुण्याच्या बरोबरीने सातारा हा आघाडीवर होता. पुण्याबाहेर झालेले हे पहिले अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन.या संमेलनात मनोगत व्यक्त करताना ॲड दादासाहेब करंदीकर म्हणाले... राष्ट्रालाही देह आणि आत्मा दोन्ही अंगे असतात. आपण या उभय अंगांचा समन्वय केला पाहिजे. निव्वळ चिंतन हा आळसाचा परिणाम होय. यासाठी जागे व्हा आणि कामाला लागा. विलायतेत अनेक पक्ष व मते असूनही ज्याप्रमाणे राष्ट्रहिताचा प्रश्न पुढे येताच सारे एक होतात, तीच धारणा येथे आपण शिकली पाहिजे आणि वाङःमयात ती प्रवृत्ती बळाविल, अशा कर्तव्यबुध्दीने वागले पाहिजे. हे दादासाहेब करंदीकरांचे भाषण स्वातंत्र्यलढ्याच्या पार्श्वभूमीवर महत्वपूर्ण होते. या भाषणाने देशातील सर्व साहित्यिकांना स्वातंत्र्यलढ्याची प्रेरणा दिली. या आपल्या भाषणात त्यांनी साहित्याची नेमकी दिशा व परिणती म्हणजे राष्ट्रभक्ती असा उद्घोष केला. साताऱ्यात संपन्न झालेल्या तिस-या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाने मराठी साहित्य संमेलनाला निश्चित दिशा दिली. १८८५ पासून १९०५ पर्यंत दहा वर्षे न झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे आणि संस्थेचे पूनर्जीवन यामुळे झाले. १९०६, १९०७, १९०८, १९०९ अशी सातत्याने पुढची संमेलने पुणे, पुणे, पुणे आणि बडोदे येथे पार पडली. साताऱ्याने पुन्हा संमेलने होण्यासाठी दिलेले योगदान अविस्मरणीय आहे.

तब्बल ५७ वर्षांनी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ४४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन १९६२ रोजी साताऱ्यात न.वि. तथा काकासाहेब गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. संमेलनाचे प्रधान अंग म्हणजे करमणूक. तो मी नव्हेच, भाऊबंदकी, रायगडला जेव्हा जाग येते ही तीन नाटके या संमेलनात रसिकाच्या भरघोस प्रतिसादात सादर झाली. या संमेलनाचे




उद्घाटक यशवंतराव चव्हाण आपल्या भाषणात म्हणाले.... ''देशात आणीबाणीची स्थिती असतानाही ज्या बाबतीत काटकसर करू नये त्यापैकी साहित्य संमेलन ही बाब आहे. साहित्यिकांनी मानवी जीवनातील संघर्ष कमी करण्याची, जिव्हाळ्याचे कूट प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अत्युच्य प्रेमाची व प्रसंगी कटुकर्तव्याची शिकवण साहित्याने घ्यावी. भारत-चीन युद्धाचे सावट या संमेलनावर होते. संमेलनाध्यक्ष काका गाडगीळ आपल्या भाषणात म्हणाले....

''साहित्याने समाजाचे सारथ्य केले पाहिजे, प्रेरणा दिली पाहिजे, ही उपासना आहे, वासना नव्हे, विनोद हवा अश्लिलला नव्हे, साहित्य रत्नाच्या खाणीतून रत्नेच पैदा केली पाहिजेत, फत्तर, धूलिकण नव्हेत. मराठी ही शैक्षणिक, माध्यमिक, राजकारणी भाषा होण्यास पात्र असून ती समृध्द आहे. ज्ञानगंगा सामान्य जनतेपर्यंत पोचविण्यास, तिच्या बोलींची जोपासना केली पाहिजे.''



✍ शिरीष चिटणीस
सातारा ७५८८८६५०५१

६६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन साताऱ्यात व्हावे यासाठी १९९३ साली श्री.छ. अभयसिंहराजे भोसले यांनी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाकडे मागणी केली होती. हे संमेलन घेण्यासाठी कोणत्याही ठिकाणाहून मागणी न आल्याने साताऱ्याच्या ऐतिहासिक परंपरेमुळे छत्रपती शाहू महाराजांच्या राजधानीला हे संमेलन मिळाले. पुन्हा एकदा मराठी साहित्य संमेलनाला मागणी नसताना सातारकरांनी मराठी साहित्य संमेलनाचे पुनर्जीवन केले.संमेलनाध्यक्ष विद्याधर गोखले म्हणाले.. समाजात ज्या भिंती निर्माण होत आहेत, त्या दूर करून समाज एकसंघ करण्याचे, मने जोडण्याचे काम साहित्याने केले पाहिजे. साहित्याची मांदियाळी यशस्वी झाली अशी सहासष्ठाव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विद्याधर गोखले यांनीच पावती देऊन टाकली. संमेलन मराठी साहित्याचे असूनही थोर बंगाली कवी सुभाषचंद्र मुखोपाध्याय यांनी उदघाटन करताना म्हंटले, या उत्सवात राष्ट्रीयता भावल्याचे प्रांजळपणे सांगून टाकले. या कवतिकाच्या दोन शब्दांनीच तीन दिवसांचा साहित्य शारदेचा दरबार सुफल संपन्न करण्यास तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ मनस्वी कष्ट करणाऱ्या सातारकरांचे उर भरून आल्याविना राहिले नाहीत. या शाबासकीने सर्वांच्याच श्रमांचा परिहार झाला. शाहू स्टेडियमवरील छत्रपती शिवराय नगरात हा साहित्यसोहळा यशस्वी होण्याचे श्रेय संघटनकुशल स्वागताध्यक्ष श्री.छ. अभयसिंहराजे भोसले आणि संयोजनकुशल शंकर सारडा यांचे व त्यांच्या सहकाऱ्यांचे जरुर होते, पण तितकेच साहित्यरसिक सातारकर जनतेचेही होते.धनाश्रयाच्या जोरावर फार तर झगमगाट निर्माण करता येतो,तर जनाश्रयाने व्यापकता. साताऱ्याचे साहित्य संमेलन नेत्रदिपक संयोजनापेक्षाही रसिकाश्रयाच्या भव्यतेसाठी इतिहासात नोंदले गेले. त्यावेळच्या तीनचार दिवसातल्या प्रतिक्रियांनी एवढा उदंड प्रतिसाद यापूर्वीच्या कोणत्याही संमेलनाला लाभला नाही असे स्पष्ट झाले होते. अशी अनेक संमेलने केलेल्या ज्येष्ठ साहित्यिकांची प्रतिक्रिया मनापासूनची होती. या संमेलनाने मनामनांवर उमटलेले तरंग अजूनही साहित्यिक-रसिक व्यक्त करतात. या संमेलनानंतर साहित्य संमेलन आम्हालाच द्या अशी मागणी प्रचंड प्रमाणात वाढली. या संमेलनाचे कोषाध्यक्ष म्हणून मी महत्वाची जबाबदारी पार पाडली.

९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन साताऱ्याच्या मसापच्या शाहूपुरी शाखेचे संस्थापक आणि त्यावेळी असलेले अखिल भारतीय महामंडळाचे कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी यांच्या १० वर्षाच्या पाठपुराव्यामुळे आणि ना. श्री छ शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या पाठिंब्यामुळे सातारा येथे जानेवारी २०२६ मध्ये संपन्न झाले.या संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांच्या मनोगतात साहित्य संमेलन हे केवळ मेळावा नसून विचार, आचार आणि समाजदिशा देणारे व्यासपीठ आहे, ही भूमिका केंद्रस्थानी येते. त्यांनी ''शब्दाच्या फडातील पाटील'' अशी ओळख मांडत मराठी भाषेचा अभिमान, शेतकरी कुटुंबातून आलेली आपली पार्श्वभूमी, आणि पाटील-कुलकर्णी युतीमधून गाव सुधारण्याची रूपकात्मक मांडणी केली. साताऱ्यात ३२ वर्षांनंतर हे संमेलन होत असल्याचा ऐतिहासिक संदर्भ देत त्यांनी या संमेलनाला सा  साताऱ्याला लाभलेला संमेलनाचा मान ही केवळ आयोजकीय घटना नसून मराठी साहित्य-संस्कृतीचा गौरव आहे. शिवेंद्रसिंहराजे यांनी साताऱ्यातील साहित्यप्रेम, संमेलनाची दिमाखदार तयारी, आणि सर्वांच्या सहकार्याची गरज अधोरेखित केली. विनोद कुलकर्णी यांनी स्वागताध्यक्षपदाची एकमताने झालेली निवड, विविध संस्थांच्या संयुक्त पुढाकाराने संमेलन होत असल्याची माहिती, आणि या उपक्रमामागील संघटनात्मक शिस्त स्पष्ट केली. अशा रीतीने विश्वास पाटील यांचे विचार, शिवेंद्रसिंहराजेंचा सांस्कृतिक अभिमान, आणि कुलकर्णींची संघटनात्मक भूमिका यांचा संगम या संमेलनाला साहित्य, समाज आणि परंपरेचे अर्थपूर्ण स्वरूप देतो.

विश्वास पाटील यांच्या मनोगतात साहित्य संमेलन हे केवळ मेळावा नसून विचार, आचार आणि समाजदिशा देणारे व्यासपीठ आहे, ही भूमिका केंद्रस्थानी येते. त्यांनी ''शब्दाच्या फडातील पाटील'' अशी ओळख मांडत मराठी भाषेचा अभिमान, शेतकरी कुटुंबातून आलेली आपली पार्श्वभूमी, आणि पाटील-कुलकर्णी युतीमधून गाव सुधारण्याची रूपकात्मक मांडणी केली. साताऱ्यात ३२ वर्षांनंतर हे संमेलन होत असल्याचा ऐतिहासिक संदर्भ देत त्यांनी या संमेलनाला सांस्कृतिक मोठेपणा दिला.

स्वागताध्यक्ष ना शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी साताऱ्याला लाभलेला संमेलनाचा मान ही केवळ आयोजकीय घटना नसून मराठी साहित्य-संस्कृतीचा गौरव आहे असे नमूद करीत शिवेंद्रसिंहराजे यांनी साताऱ्यातील साहित्यप्रेम, संमेलनाची दिमाखदार तयारी, आणि सर्वांच्या सहकार्यामुळेच या संमेलनाची ऐतिहासिक नोंद झाल्याचे स्पष्ट केले. या संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी यांनी स्वागताध्यक्षपदाची एकमताने झालेली निवड, विविध संस्थांच्या संयुक्त पुढाकाराने संमेलन यशस्वी केल्याचे स्पष्ट केले. अशा रीतीने विश्वास पाटील यांचे विचार, शिवेंद्रसिंहराजेंचा सांस्कृतिक अभिमान, आणि विनोद कुलकर्णीची संघटनात्मक भूमिका यांचा संगम या संमेलनाला साहित्य, समाज आणि परंपरेचे अर्थपूर्ण स्वरूप देण्यासाठी यशस्वी ठरला. ९६ वे संमेलन वर्धा,९७ वे संमेलन अमळनेर आणि ९८ वे संमेलन दिल्ली येथे झाले होते. या तिन्ही ठिकाणी गर्दी,पुस्तक विक्री कमी प्रमाणात झाली. सातारा येथे संपन्न झालेल्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाने गर्दी,ग्रंथ विक्री आणि मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्या नंतरचे संमेलन यासाठीची यशस्वीता संपन्न करीत सातारा हा सांस्कृतिक ब्रँड आहे पुन्हा सिद्ध केले. या संमेलनाने मराठी भाषेच्या अभिजात भाषेमध्ये अधिक वेगळे लिखाण करण्यासाठी साहित्यिकांना नवचैतन्य प्राप्त झाले आहे.

# नात्यांची घट्ट वीण तोडण्यासाठी ''डिव्होर्स'' हा ''सोर्स'' नव्हे...

**ज्योतिर्मय साहित्य**



लता आणि ललित दोघांचं एकमेकांवर जीवापाड प्रेम असलेलं जोडपं. कॉलेज पासून जवळपास ४-५ वर्षे दोघांनी एकमेकांना डेट केलं. दोघेही एकमेकांना खूप जवळून ओळखत होते. दोघेही आता चांगल्या नोकरीच्या शोधात होते. दोघांनी घरच्यांशी लग्नाबद्दल बोलायचं ठरवलं. हो.. नाही.. म्हणत म्हणत दोघांच्याही घरच्यांनी लग्नाला परवानगी दिली.

थाटामाटात लग्न पार पडलं. दोघेही खूप खूष होते. लग्नानंतर पंधरा दिवसातच लताला मोठ्या कंपनीत नोकरी लागली. लग्नाला अवघे दोन महिने झाले. या दोन महिन्यातच लता फार बदलली. लताची चिडचिड, नेहमीचा राग, रोजरोज बाहेरच्या जेवणाचे पार्सल, गरज नसताना नेहमी कपड्यांची खरेदी, मित्रमैत्रिणी, पार्ट्या या सर्व गोष्टींमध्ये ती फार फार व्यस्त होती.

लताच्या पाहुण्यातील लग्न होते. आणि त्या लग्नाला दोघेही जायचे ठरले होते. सुट्टीबद्दल दोघांचं तसं सविस्तर बोलणंही झालं होतं. दुसऱ्या दिवशी लता ऑफिसमधून लवकर आली. आणि लगेच तावातावाने बॅग भरायला घेतली. ललित घाईघाईने लताच्या मागे गेला. तिला विचारलं. ''लता अगं काय हे? काय झालं? आणि बॅग का भरते आहेस? लता ललितशी एकही शब्द बोलत नव्हती. लताच्या तुलनेत ललित साधा, सरळ, शांत, विनम्र होता. लता मात्र अतिशय तापट, रागीट. तरीही प्रेमाखातर तो तिच्यापुढे नेहमी नमतंच घ्यायचा. लता रागारागात म्हणाली, ''मी चाल्ले लग्नाला''. ललित म्हणाला,

''आता हे काय मधेच? दोघं जायचं ठरलंय ना आपलं. मग तु एकटी का निघते आहेस. आणि एवढ्या घाईघाईने. लग्नाला अजून दोन दिवस बाकी आहेत. उद्या निघुयात आपण''. ''नाही मला आजच जायचं आहे. तु ये पुन्हा''. लता अतिशय रागात बोलत होती.



✍ सौ. मनीषा सोन्नेकर/सोनकांबळे
देगलूर. जि. नांदेड
मो. 9960028899

बघता बघता लता बॅग घेऊन निघाली सुद्धा. ललित लताला थांबवण्याचा अटोकाट प्रयत्न केला. पण त्याचा कांहीच फायदा नाही झाला. लता कांहीच न बोलता निघून गेली. ललित लग्नाला नाही जाऊ शकला. ललितने लताला खूप फोन कॉल केले पण लताने ललितचा एकही

कॉल घेतला नाही. तिकडे लताने घरच्यांना सरळ सरळ सांगितलं की, मला ललित सोबत राहायचं नाही. आणि क्षणाचा विलंब न करता आणि लताला कुठलाही प्रश्न व कारण न विचारता तिच्या आईबाबांनी हो म्हटलं. दहा दिवसानंतर ललित जेव्हा लताला आणण्यासाठी तिच्या घरी गेला. तेंव्हा त्याला तिच्या वडिलांनी, भावानी, मारहाण केली. आईने नकोनको ती शिवीगाळ केली. ''माझं काय चुकलं? ते तरी सांगा. लताशी बोलू तरी देत मला''. ललित लता लता म्हणून हाका मारत होता. पण कांही केल्या लता बाहेर येऊन ललितशी एकही शब्द बोलली नाही. ललित रिकाम्या हातांनी तिथून निघून गेला.

लगेच दुसऱ्या दिवशी ललितला लताकडून ''डिव्होर्स नोटीस'' पाठवली गेली. नोटीस पाहून ललित पूर्णपणे कोलॅप्स झाला. तिकडे लता आपल्या माणसांसोबत आनंदी होती. आणि ललित मात्र न केलेल्या चुकांची सजा भोगत होता. डिव्होर्स नोटीस पाठवून सुद्धा ललित लताच्या घरी गेला. यावेळी सुद्धा ललितला मारहाण केली गेली. लताची आई म्हणाली, '' रिकामटेकडा कुठला. काम नाही, धंदा नाही. आमच्या मुलीच्या पैशावर जगणार का तु? चल चालता हो इथून''. लग्नानंतर अवघ्या दोन महिन्यात लता ललित कायमसाठी वेगळे झाले. लता कुठल्याही प्रश्नांची उकल न करता किंवा स्पष्ट असे कुठले कारण न सांगता निघून गेली.

पाच वर्षाचे प्रेम आणि लग्नाचे दोन महिने. एकमेकांना ओळखण्यासाठी कोणता कालावधी जास्त आहे. अर्थात प्रेमातील पाच वर्षाचा कालावधी. आणि कायमसाठी वेगळे होण्यासाठी किती वेळ लागला?. किंवा काय कारण होते?. ''लग्नाला तु आज जाऊ नकोस. डिव्होर्स साठी केवळ एवढेसे कारण असु शकते का? यात ललित या पात्राची काय चूक आहे?. ललितची कांहीच चूक नसताना त्याला सजा मिळाली. संसार म्हटला कि, भांड्याला भांडे लागणारच. संसार म्हटला मीठ, मिर्चू कमी पडणारच. संसारातील कमी-जास्त, मागे पुढे होणाऱ्या गोष्टी सांभाळत संसार टिकवून ठेवावा व निभवावा लागतो. पती-पत्नीच्या नात्यात एकच गोष्ट महत्वाची असते. तो म्हणजे ''विश्वास''.


विश्वासावरच पती पत्नीचे नाते टिकून असते.या विश्वासाला सोबत घेऊनच संसार चालवावा लागतो. एकमेकांना वेळ देत स्पष्टपणे बोलल्यानेच प्रश्नांची उकल होते व निर्माण झालेल्या समस्यांचे सहजरीत्या निराकरण करता येते. लग्न म्हणजे दोन मनं, दोन परिवार, आचार विचारांचे, संस्काराचे मिलन होय. लग्न म्हणजे खेळ नव्हे. जो मांडला आणि क्षणात मोडला. मांडणे आणि मोडणे यातील फरक समजला कि लग्न, पती -पत्नी, संसार या गोष्टींची व्याख्या व संकल्पना सहज समजते. छोट्या-मोठ्या कुरबुरी, वाद, गैरसमज झाले असतील तर ऐकमेकांशी बोला, सवांद साधा, झालेल्या चुकांबद्दल मोकळेपणाने एकमेकांना स्पष्टीकरण द्या, कामाच्या व्यापातून एकमेकांसाठी वेळ काढा, वाद व संतापाच्या भरात टोकाचा निर्णय घेऊ नका, होणाऱ्या बाळाचा विचार करा.

तडकाफडकी लगेच डिव्होर्सचा विचार मनात आणू नका. पती पत्नीच्या घट्ट वीण असलेल्या नात्यात खोटी कारणे देत बसू नका. कारण आयुष्यातील सर्वात पक्के व मजबूत नाते कोणते असेल? तर ते म्हणजे पती पत्नीचे नाते. म्हणूनच पती-पत्नी या नात्याची घट्ट वीण तोडण्यासाठी ''डिव्होर्स'' हा एकमेव ''सोर्स'' नव्हे.

# जननायक बिरसा मुंडा

**ज्योतिर्मय साहित्य**

आज ९ जून, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांचा स्मृतिदिन. जननायक बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी रांची जवळील लिहती या खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सुगमा मुंडा तर आईचे नाव करमी हातू असे होते. त्यांचे वडील शेतमजूर होते. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांना इंग्रजी माध्यमाच्या चाईबासा इंग्लिश मिशनिरी स्कुलमध्ये शिक्षणाची संधी मिळाली. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडला. बिरसा मुंडा हे जरी इंग्रजी शाळेत शिकत असले तरी त्यांना भारतीय संस्कृतीचा अभिमान होता. १८७८ - ७९ मध्ये ब्रिटिशांनी वन कायद्यात बदल केला. या नव्या कायद्यानुसार आदिवासींच्या ताब्यात असलेल्या जंगलांवर ब्रिटिशांची मालकी झाली. या कायद्यामुळे आदिवासींवर  बेघर  होण्याची वेळ आली. आदिवासींनी उदरनिर्वाहासाठी फळे, कंदमुळे, लाकुडफाटे अथवा जनावरांसाठी चारा तोडल्यास त्यांना शिक्षा होऊ लागली आणि आदिवासींच्या आस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला. या कायद्या विरोधात आदिवासींनी न्यायालयात दाद मागितली पण तिथेही त्यांना न्याय मिळाला नाही. १८८४ साली बिहारमध्ये भीषण दुष्काळ पडला. भीषण दुष्काळ आणि उपासमारीने



अनेक लोक मरण पावली. जननायक बिरसा मुंडा यांनी या काळात आदिवासी समाजाची निःस्वार्थ सेवा केली. भीषण दुष्काळात लोक उपासमारीने मरत असताना लोकांप्रति संवेदना व्यक्त करण्याऐवजी जुलमी ब्रिटिश सरकारने अवाजवी शेतसारा आकारला. ब्रिटिशांनी आकारलेल्या अवाजवी शेतसऱ्याला जमीनदार आणि जहागिरदारांनी पाठिंबा दिला त्यामुळे चिडलेल्या बिरसा मुंडा यांनी जनआंदोलन उभारले. हे जनआंदोलन जहागीरदार व जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध होते. आदिवासी बांधव मोठ्या संख्येने या जनआंदोलनात सहभागी होऊ लागल्याने हे आंदोलन दडपण्यासाठी जहागीरदार आणि जमीनदारांच्या माध्यमातून ब्रिटिशांनी बिरसा मुंडा यांना रोखण्याचा प्रयत्न केला. १८८५ साली बिरसा मुंडा यांना दोन वर्ष कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना हजारीबागच्या तुरुंगात पाठवण्यात आले. तुरुंगात असतानाच त्यांनी जुलमी ब्रिटिश सरकार उखडून टाकण्याचा संकल्प केला. दोन वर्षांची शिक्षा भोगून आल्यावर त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून ब्रिटिश सरकार विरुद्ध लढा पुकारला. १८८७ मध्ये बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने ब्रिटिशांविरुद्ध अनेक लढाया करून त्यांना जेरीस आणले. या लढाया त्यांनी पारंपरिक शस्त्रांनी म्हणजे भाले, तलवारी, धनुष्यबाण यांच्या साहाय्याने लढल्या. आदिवासी, दुर्गम, डोंगराळ भागातून पारंपरिक पद्धतीने लढा उभारून त्यांनी ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी समाज आपल्याला दाद देत नाही हे लक्षात आल्यावर ब्रिटिशांनी अतिरिक्त ८ कुमुक मागवली आणि आदिवासींवर हल्ला केला त्यात ४०० आदिवासी बांधव शहीद झाले. तरीही बिरसा मुंडा यांनी हार मानली नाही त्यांनी आपली लढाई चालूच ठेवली. १८९० मध्ये बिरसा मुंडा  डोमवाडी पहाडात आदिवासी बांधवांना मार्गदर्शन करत असताना ब्रिटिश सैन्याने त्यांच्यावर हल्ला केला. भीषण लढाई झाली. बिरसा मुंडा यांना अटक करून रांचीच्या कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. २० मे १९०० रोजी त्यांना एकांत कोठडीत ठेवण्यात आले. एकांत कोठडीत  जेवण करण्यास त्यांनी नकार दिला त्यामुळे त्यांना अशक्तपणा आला. न्यायालयातच ते बेशुद्ध पडले. त्यांना न्यायालयातून कारागृहात आणण्यात आले औषध उपचार करण्यात आले त्यांची तब्येत सुधारली मात्र ९ जून १९०० रोजी त्यांना रक्ताची उलटी  झाली ते बेशुद्ध पडले व त्यातच त्यांची प्राणज्योत माळवली.


श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

त्यांचा मृत्यू एशियाटिक कॉलरा या आजाराने झाला असे सरकारच्या वतीने सांगण्यात आले असले तरी त्या आजाराची कोणतेही लक्षणे त्यांच्या शरीरावर दिसत नव्हते त्यामुळेच इतिहासकार ब्रिटिशांनी त्यांची हत्या केली असा संशय व्यक्त करतात. नेपोलियनला जसे आर्सेनिक देऊन ठार मारले तेच लक्षणे बिरसा मुंडा यांच्या शरीरावर दिसत होते शिवाय त्यांना कारागृहातच दफन करून पुरावा नष्ट करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जननायक बिरसा मुंडा यांचे योगदान अतुलनीय असे आहे. आदिवासींच्या न्याय हक्कासाठी मोठा लढा उभारून त्यांनी जे महान कार्य केले त्याला तोड नाही त्यामुळेच त्यांना आदिवासी जननायक हा किताब जनतेने बहाल केला. आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!


# मराठीचा घसरलेला टक्का !

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)




मुलांना मराठीची खरी गोडी शालेय स्तरापासूनच लागली पाहिजे; ती केवळ एक परीक्षा म्हणून अभ्यासली जाऊ नये. ही गोडी निर्माण करण्याची जबाबदारी शिक्षक, पालक आणि संपूर्ण समाजाने उचलली पाहिजे. मुलांच्या पाठ्यपुस्तकातील धडे, कविता त्यांना मराठीची गोडी निर्माण होईल अशा असाव्यात. घरातही मराठी पुस्तके, वर्तमानपत्रे यावीत. पालकांनी देखील मुलांसमोर दर्जेदार अशी मराठी पुस्तके स्वतः वाचावीत. सुरुवात नेहमी स्वतः पासून करावी लागते. नुसते वाचन करा म्हणून सांगितले तर मुले ऐकणार नाहीत. यासोबतच, भविष्यातील स्पर्धा परीक्षांमध्ये आणि नोकऱ्यांमध्येही मराठीला मानाचे व अनिवार्य स्थान मिळाले पाहिजे. ''मराठी शिकल्याशिवाय आपल्याला पर्याय नाही'' हे जेव्हा मुलांच्या आणि पालकांच्या लक्षात येईल, तेव्हाच मराठीच्या अभ्यासाला खऱ्या अर्थाने प्राधान्य मिळेल.



✍ विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
भ्रमणध्वनी ९४०३७४९९३२

आपल्याला केवळ गणित, विज्ञान, इतिहास किंवा भूगोल येऊन उपयोग नाही; आपल्याला आपली मातृभाषाही उत्तम लिहिता, बोलता आणि वाचता आली पाहिजे. ''माझा मराठाचि बोलू कौतुके। परी अमृतातेही पैजा जिंके।'' या माउलींच्या उद्गाराची अनुभूती आमची मुले केव्हा घेणार ? जेव्हा त्यांना मराठी भाषेत खरोखर रस वाटू लागेल तेव्हाच ना ! आणि याच मराठी मातीतून उद्याचे उत्तम साहित्यिक, वक्ते, शास्त्रज्ञ आणि समाजाला दिशा देणारे समाजसेवक निर्माण होतील. तेव्हाच आपण खऱ्या अर्थाने आणि गर्वाने म्हणू शकू...

''लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी...''

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559